शब्दांना सत्याची धार

# प्रहार

RANE PRAKASHAN PRIVATE LIMITED

मुंबई ● शुक्रवार, ७ ऑगस्ट २०२६ | मुंबई, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, नाशिक येथून एकाचवेळी प्रसिद्ध ● वर्ष २२ ● अंक ३०० ● पाने १० ● ₹ ५.००

www.prahaar.in epaper.prahaar.in





म्हाडाच्या २ हजार ६४० घरांची संगणकीय सोडत

पान : मुंबई



भारत-श्रीलंका कसोटीपूर्वीच वाद

पान : क्रीडा

## वेचक

### बलात्कार प्रकरणात तेजपालला सक्तमजुरी

**पणजी :** तहलका मासिकाचे माजी मुख्य संपादक तरुण तेजपाल यांना २०१३ मधील बलात्कार प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने १० वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा आणि ५ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. गोव्यातील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये नोव्हेंबर २०१३ मध्ये झालेल्या 'थिंकफेस्ट' कार्यक्रमादरम्यान हॉटेलच्या लिफ्टमध्ये सहकाऱ्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा त्यांच्यावर आरोप होता. या प्रकरणी ३० नोव्हेंबर २०१३ रोजी त्यांना अटक झाली होती आणि २०१४ मध्ये जामीन मिळाला होता. याआधी २०२१ मध्ये गोव्याच्या सत्र न्यायालयाने पुराव्याअभावी तेजपाल यांची निर्दोष मुक्तता केली होती.

### अरविंद केजरीवाल यांचा मेटावर संताप

**नवी दिल्ली :** आपचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी त्यांचे सोशल मीडिया अकाउंट भारतात बंद केल्याप्रकरणी मेटाच्या कार्यप्रणालीवर संताप व्यक्त केला आहे. आपले अकाउंट भारतात दाखवत नसल्याची माहिती त्यांनी सोशल मीडियावर दिली. मेटाच्या भारत कार्यालयाकडे तोंडी चौकशी केल्यानंतर त्यांचे अकाउंट भारतात ब्लॉक केल्याचे स्पष्ट झाले. मात्र, अकाउंट बंद करण्यामागील ठोस कारण किंवा बंदी कशी हटवावी, याबाबत अधिकाऱ्यांकडून कोणतीही माहिती दिली जात नसल्याचा गंभीर आरोप केजरीवाल यांनी केला आहे.

### लोकसभेत कर दुरुस्ती विधेयक मंजूर

**नवी दिल्ली :** व्यवसाय सुलभता सुधारणे, परकीय थेट गुंतवणूक आकर्षित करणे, उत्पादनाला प्रोत्साहन देणे आणि जागतिक गुंतवणूक केंद्र म्हणून भारताचे स्थान अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने 'कर आणि इतर कायदे (दुरुस्ती) विधेयक, २०२६' गुरुवारी लोकसभेत मंजूर झाले. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेले हे विधेयक, विरोधी पक्षांच्या गदारोळादरम्यान आवाजी मतदानाने संमत केले. ४ ऑगस्ट रोजी सभागृहात मांडलेले हे विधेयक, ५ जून रोजी लागू केलेल्या 'आयकर (दुरुस्ती) अध्यादेश, २०२६' ची जागा घेईल.


# 'जेन-झी' जुन्या पिढीपेक्षा अधिक प्रामाणिक : डॉ. मोहन भागवत

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

"भारताच्या शिक्षणव्यवस्थेत अजूनही अनेक सुधारणा करण्याची गरज असून, त्या अपेक्षित वेगाने होत नसल्यामुळे असंतोष निर्माण होत आहे. मात्र, लोकशाहीत संवाद हाच सर्व प्रश्नांवर तोडगा काढण्याचा मुख्य मार्ग आहे. नीट परीक्षा गोंधळाच्या पार्श्वभूमीवर रस्त्यावर उतरलेली आजची 'जेन-झी' आणि 'जेन-अल्फा' ही नवी पिढी विरोधासाठी विरोध करत नसून, त्यांच्या तक्रारी आणि नाराजी खऱ्या आहेत. ही पिढी आमच्या पिढीपेक्षा अधिक प्रामाणिक, तर्कसंगत उत्तरे मागणारी आणि देशभक्त आहे," असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी गुरुवारी केले. त्याचवेळी सरकारकडून 'जेन-झी'सोबत संवादाला विलंब झाल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.

'इंडियाज इंटरनॅशनल मूव्हमेंट टू युनायटेड नेशन्स' या संस्थेच्या १५ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित वार्षिक चॅम्पियनशिप परिषदेत ते बोलत होते. देशभरातील १०० हून अधिक शहरांमधील १५ ते १९ वयोगटातील दोन हजारांपेक्षा जास्त शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी त्यांनी या वेळी संवाद साधला. आपल्या संवादादरम्यान सरसंघचालकांनी शिक्षण व्यवस्था, आंदोलनाचे स्वरूप, लोकशाहीतील संवादाचे महत्त्व, एलजीबीटीक्यू समुदाय, महिलांचा सहभाग, पर्यावरण, बेरोजगारी आणि आरक्षण अशा विविध विषयांवर सविस्तर भूमिका मांडली.

"आम्ही लहान असताना मोठ्यांनी सांगितलेले प्रश्न न विचारता मान्य करायचो. मात्र, आजची तरुण पिढी प्रश्न विचारते; त्यांना तर्कसंगत उत्तरासोबतच आपुलकीही हवी असते," असे सांगत भागवत यांनी तरुणाईच्या भूमिकेचे समर्थन केले. "जेन-झी किंवा जेन-अल्फा पिढीने आंदोलन करू नये, असे म्हणणे अयोग्य आहे. संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भाषणांमधून लोकशाहीत आपले प्रश्न मांडण्याचे मार्ग स्पष्ट मिळतात. शिक्षण क्षेत्रातील आंदोलने ही व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यासाठी असावीत, कोणा एकाच्या विरोधासाठी नाही. प्रश्न एवढा टोकाला जाण्यापूर्वीच संवाद सुरू झाला असता, तर अशी वेळ आली नसती. जेव्हा एखादा विषय एवढा ताणला जातो, तेव्हा यंत्रणेत कुठेतरी चूक किंवा उणीव राहिली आहे हे मान्य करावेच लागते," असे परखड मतही त्यांनी व्यक्त केले.



सरसंघचालक म्हणाले, "लोकशाहीत ज्याला इंग्रजीत 'डिबेट' म्हणतात, त्याला आपल्या परंपरेत 'शास्त्रार्थ' म्हणतात. शास्त्रार्थात पूर्वपक्ष आणि उत्तरपक्ष अशा सर्व बाजूंचा विचार करून सत्याचा शोध घेतला जातो. विविध आणि परस्परविरोधी मते एकत्र आल्यावरच सत्याचे व्यापक चित्र स्पष्ट होते. त्यामुळे अशा संवादाची लोकशाहीत अत्यंत गरज आहे. आंदोलन करणाऱ्या तरुणांना एखाद्या देशाचे 'एजंट' किंवा तत्सम विशेषणे लावणे पूर्णपणे चुकीचे आहे. ती आपलीच मुले असून देशाची भावी पिढी आहे. आंदोलनादरम्यान निरपराध तरुणांवर लाठीमार किंवा पेलेट गनचा वापर होण्याच्या घटनांबद्दल बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, याप्रकरणी पुरेशी खात्रीशीर माहिती नसताना निष्कर्ष काढणे अयोग्य आहे. काही विघातक घटकांनी यात शिरकाव केल्याच्या बातम्या मी वाचल्या असल्या, तरी मला जर कोणावर विश्वास ठेवायचा असेल तर मी माझ्या देशाच्या 'जेन-झी' तरुणांवरच विश्वास ठेवेन", असेही त्यांनी सांगितले.

### शिक्षण व्यवस्थेत बदलांची गरज

शिक्षणाच्या व्यापारीकरणावर चिंता व्यक्त करत डॉ. भागवत म्हणाले, "शिक्षण हा व्यवसाय नसून ती जीवनाची मूलभूत गरज आहे. त्यामुळे ते सर्वसामान्यांना सहज परवडणारे आणि उपलब्ध होणारे असले पाहिजे. शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी सरकारवर टाकून चालणार नाही, ती समाजाचीही संयुक्त जबाबदारी आहे. अनेक गावकऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन दानशूर व्यक्तींच्या मदतीने शाळांचा कायापालट केला आहे. शिक्षणाचा सर्व आर्थिक भार सरकारवर टाकण्याऐवजी समाजानेही यात सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. आता सरकारने शिक्षण क्षेत्रात एखादा ठोस प्रकल्प हाती घेऊन समाजाला सोबत घेऊन सकारात्मक बदल घडवून आणावेत", अशी सूचनाही त्यांनी केली.

# अब्जावधींच्या टॅरिफचा अमेरिकेकडून परतावा

## डोनाल्ड ट्रम्प यांना सर्वोच्च न्यायालयाचा दणका

◆ वॉशिंग्टन (वृत्तसंस्था):

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जगभरात आयात शुल्काची (टॅरिफ) भीती दाखवून आणि परस्पर शुल्क धोरणाचे अस्त्र उगारून मोठ्या प्रमाणावर संपत्ती गोळा केली होती. याच धोरणामुळे जागतिक पातळीवर मोठे व्यापार युद्ध देखील सुरू झाले होते. मात्र, आता हाच निर्णय ट्रम्प यांच्यासाठी अडचणीचा ठरला असून अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने याविरोधात दाखल झालेल्या याचिकांवर ऐतिहासिक निर्णय देत ट्रम्प प्रशासनाला मोठा धक्का दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने रद्द केलेल्या या "लिबरेशन डे" टॅरिफप्रकरणी अमेरिकेने तब्बल शंभर अब्ज डॉलरचे रिफंड यशस्वीरित्या पूर्ण केले आहे.

हे रिफंड 'आंतरराष्ट्रीय आपत्कालीन आर्थिक शक्ती अधिनियम' (आयईईपीए) अंतर्गत लादण्यात आलेल्या अतिरिक्त शुल्कांशी संबंधित आहेत. या वर्षाच्या फेब्रुवारी महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने हा कायदा आणि त्यानुसार लादलेले शुल्क पूर्णपणे अवैध ठरवले होते.

न्यायालयाच्या या निकालानंतर प्रभावित झालेल्या एकूण सुमारे १६६ अब्ज डॉलरपैकी निम्म्याहून अधिक रक्कम आता परत करण्यात आली आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या आपत्कालीन परिस्थितीसाठी १९७७ मध्ये बनवलेल्या या कायद्याचा गैरवापर करून ट्रम्प यांनी व्यापारी भागीदारांवर अवाजवी शुल्क लादले होते आणि याद्वारे त्यांनी आपल्या अधिकारक्षेत्राचे उल्लंघन केले होते, असा निष्कर्ष न्यायालयाने नोंदवला.

### नवीन 'कॅप' प्रणालीद्वारे रिफंडची प्रक्रिया पूर्ण

■ सीमा शुल्क विभागाच्या व्यापार कार्यक्रमांचे कार्यकारी संचालक ब्रेंडन लर्ड यांनी दाखल केलेल्या घोषणेनुसार, पात्र रिफंड मोजण्यासाठी आणि त्यावर प्रक्रिया करण्यासाठी विभागाने आपल्या संगणकीय व्यासपीठात 'कॅप' नावाची एक नवीन यंत्रणा विकसित केली आहे. नवीन प्रणाली २० एप्रिल रोजी आयातदार, दलालांसाठी उपलब्ध करून दिली होती.





■ ३१ जुलै रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत सुमारे १२८.६८ अब्ज डॉलरचे संभाव्य आणि प्रमाणित रिफंड या नवीन प्रणालीमध्ये स्वीकारले गेले. यात ड्युटी आणि व्याजासह अंदाजे शंभर अब्ज डॉलरचे रिफंड पूर्ण झाले असून, सीमा शुल्क विभागरूपी यंत्रणेद्वारे ते प्रमाणित करून वितरणासाठी थेट अमेरिकेच्या वित्त विभागाकडे वर्ग केले आहेत.



# अपात्रतेचा निकाल लागल्यानंतर 'चिन्हा'चा मुद्दा दुय्यम ठरेल

## सर्वोच्च न्यायालयाची महत्त्वपूर्ण निरीक्षणे

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था):

सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर शिवसेना पक्ष आणि चिन्ह प्रकरणाची सुनावणी पार पडली. यावेळी न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी काही महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली.

सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांनी निरीक्षण व्यक्त केले की, आमदारांवरील अपात्रतेची कारवाई आणि पक्षचिन्ह हे वेगवेगळे विषय आहेत. अपात्रतेच्या कारवाईचा निकाल लागल्यानंतर आणि नवीन विधानसभा अस्तित्वात आल्यानंतर, 'चिन्हा'चा मुद्दा कदाचित दुय्यम ठरू शकेल. अपात्रतेचा विचार करताना व्यक्तीने स्वेच्छेने राजकीय पक्षाचे सदस्यत्व सोडले आहे का, हा प्राथमिक निकष असतो. विधिमंडळ पक्षाचे सदस्यत्व स्वेच्छेने सोडल्याने मूळ राजकीय पक्षाशी असलेला संबंध आपोआप संपुष्टात येत नाही. यावर उबाठाकडून ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी सहमती दर्शवत सांगितले की, या दोन्ही कारवायांचा एकमेकांशी संबंध आहे. त्यावर न्यायमूर्ती बागची यांनी, "त्यांचा संबंध आहे कारण त्या काही अंशी एकमेकांशी संबंधित आहेत," असे स्पष्ट केले. "विधानसभा अध्यक्ष वर्तणुकीच्या आधारे या मुद्द्यावर निर्णय घेतात. उदाहरणार्थ, जून २०२२ मध्ये पक्षाध्यक्षांनी बोलावलेल्या बैठकीच्या सूचनेला प्रतिसाद न देणे, ही बाब स्वेच्छेने पक्षाचे सदस्यत्व सोडण्यासारखी आहे का?" असा सवाल न्यायमूर्ती बागची यांनी केला.

### 'शिवसेना कोणाची?' जनतेनेच निकाल दिला : शिंदे

**मुंबई (प्रतिनिधी) :** शिवसेना पक्षाच्या मालकीबाबत सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीदरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर कडाडून हल्ला चढवला आहे. "शिवसेना कोणाची, याचा निकाल महाराष्ट्राच्या जनतेने आधीच दिला आहे. आम्ही चाळीस आमदारांसह बाहेर पडलो आणि जनतेने आम्हाला साठ आमदारांपर्यंत पोहोचवून आपल्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले," असा ठाम दावा त्यांनी केला. जनतेच्या न्यायालयात आपला विजय आधीच झाल्याचे सांगत, आता न्यायालयीन प्रक्रियेवरही पूर्ण विश्वास असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विरोधकांच्या सातत्याने होत असलेल्या 'घटनाबाह्यसरकार' या आरोपांचा समाचार घेताना शिंदे म्हणाले की, सरकार संविधानाने आणि कायद्याने घालून दिलेल्या प्रक्रियेनुसार स्थापन झाले असून ते घटनाबाह्य नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. तरीही विरोधक तीच जुनी आणि फाटलेली कॅसेट पुन्हा पुन्हा वाजवत आहेत, असा टोला त्यांनी लगावला. तसेच, विरोधकांची भूमिका दुटप्पी असून निकाल त्यांच्या बाजूने लागला तर न्यायालयाचा गौरव करायचा आणि विरोधात गेला की न्यायालयाला शिकवण्याचा प्रयत्न करायचा, अशी टीका त्यांनी केली.

# डॉक्टरांचा संप मागे

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेत (एमएमसी) सीसीएमपी पात्रता असलेल्या बीएचएमएस डॉक्टरांना नोंदणी देण्याच्या प्रस्तावाला विरोध करत निवासी डॉक्टरांनी सुरू केलेले आंदोलन अखेर मागे घेतले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर हे आंदोलन मागे घेतले आहे. मुंबईतील महापालिका रुग्णालयांमधील निवासी डॉक्टरांची संघटना असलेल्या बीएमसी मार्डने आंदोलन थांबवले आहे. तसेच महाराष्ट्रातील निवासी डॉक्टरांची संघटना असलेल्या सेंट्रल मार्डनेही राज्यभर सुरू असलेले बेमुदत आंदोलन मागे घेतलं आहे. हे आंदोलन न्यायालयाच्या आदेशाचा आदर राखण्यासाठी आणि रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून मागे घेतलं आहे. मात्र मागण्या मान्य झालेल्या नाहीत, असं संघटनांनी स्पष्ट केले आहे.

सीसीएमपी पात्रताधारक बीएचएमएस डॉक्टरांच्या महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेत नोंदणीच्या निर्णयाला विरोधासाठी निवासी डॉक्टरांकडून हे आंदोलन करण्यात आलं होतं. या आंदोलनात संघटनांनी नियमित वैद्यकीय सेवा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला होता. मात्र मुंबई उच्च न्यायालयाने या आंदोलनाची स्वतःहून दखल घेत डॉक्टरांना पुन्हा कामावर रुजू होण्याचे निर्देश दिले. तसेच सरकार आणि डॉक्टरांच्या प्रतिनिधींमध्ये चर्चा करून या विषयावर तोडगा काढण्यास सांगितलं आहे. न्यायालयाचा सविस्तर आदेश अद्याप येणं बाकी आहे. न्यायालयाचा अंतिम निर्णय होईपर्यंत बीएचएमएस–सीसीएमपी नोंदणी प्रक्रिया थांबवावी. तसेच रुग्णांच्या सुरक्षिततेचा विचार करून योग्य नियम तयार केल्याशिवाय ही प्रक्रिया सुरू करण्यात येऊ नयेत. या मागण्या संघटनेककडून कायम ठेवण्यात आल्या आहेत.





# 'विनयभंगा'सारख्या शब्दांवर न्यायालयात बंदी

## न्यायाधीशांसाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी

◆ हैदराबाद (वृत्तसंस्था):

भारतीय न्यायालयांना कालबाह्य मानसिकता आणि पूर्वग्रहांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या एका महत्त्वपूर्ण समितीने ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. 'नॅशनल ज्युडिशिअल अकादमी'ने स्थापन केलेल्या आणि सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती अनिरुद्ध बोस यांच्या अध्यक्षतेखालील या समितीने लैंगिक गुन्ह्यांशी संबंधित खटल्यांसाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत.



७४ पानांच्या या विशेष अहवालात देशभरातील न्यायाधीशांना सल्ला देण्यात आला आहे की, न्यायालयीन कामकाज आणि निकालांमध्ये महिलांचा उल्लेख करताना त्यांनी आदरपूर्ण, साधी आणि कायदेशीरदृष्ट्या अचूक भाषा वापरावी. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या एका वादग्रस्त निकालाची सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेतल्यानंतर हा अहवाल तयार करण्यात आला आहे. यात नमूद केले आहे की, न्यायालयांमध्ये वापरली जाणारी भाषा हे केवळ संवादाचे माध्यम नसून ती निष्पक्ष न्याय आणि पीडितेची प्रतिष्ठा यांच्याशी निगडित आहे. न्यायाधीशांच्या असंवेदनशील टिप्पणीमुळे पीडितांना अधिक मानसिक आघात सहन करावा लागतो आणि त्यामुळे समाजातील लोकांना गुन्ह्यांविरुद्ध आवाज उठवण्यापासून परावृत्त केले जाते.



# राज्यातील १ लाख ६० हजार गोविंदांना १० लाखांचे विमा संरक्षण

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

दहीहंडी उत्सवासाठी राज्यातील तब्बल १ लाख ६० हजार गोविंदांना १० लाख रुपयांपर्यंतचे मोफत विमा संरक्षण देण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. क्रीडा व युवक कल्याण विभागाच्या वतीने गुरुवारी यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला. गतवर्षी १ लाख ५० हजार गोविंदांना हे कवच देण्यात आले होते; मात्र यंदा उत्सवाचा वाढता उत्साह आणि गोविंदा पथकांची वाढती संख्या विचारात घेऊन विमा योजनेची व्याप्ती वाढवण्यात आली आहे.

शासन निर्णयानुसार दहीहंडी उत्सवाच्या दिवशी मानवी मनोरे रचताना दुर्दैवाने कोणताही अपघात घडल्यास गोविंदांना सर्वसमावेशक आर्थिक मदत उपलब्ध करून दिली जाणार आहे. मानवी मनोरा कोसळून गोविंदाचा अपघाती मृत्यू झाल्यास, दोन्ही डोळे अथवा दोन अवयव निकामी झाल्यास किंवा कायमस्वरूपी पूर्ण अपंगत्व आल्यास १० लाख रुपयांचे आर्थिक संरक्षण दिले जाईल. तसेच अपघातात एक हात, एक पाय किंवा एक डोळा गमावल्यास ५ लाख रुपये आणि कायमस्वरूपी अपूर्ण अपंगत्व आल्यास विमा पॉलिसीतील निश्चित टक्केवारीनुसार मदत मिळण्याची तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय मनोरे रचताना जखमी होणाऱ्या गोविंदांवर रुग्णालयात वैद्यकीय उपचार करावे लागल्यास प्रत्यक्ष उपचाराचा खर्च अथवा जास्तीत जास्त १ लाख रुपयांपर्यंतचे वैद्यकीय कवच शासनाकडून दिले जाणार आहे.

या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पुणे येथील क्रीडा व युवक कल्याण आयुक्तांवर मुख्य जबाबदारी सोपवण्यात आली आहे. पारदर्शक आणि विहित टेंडर पद्धतीचा अवलंब करून प्रति गोविंदा ७५ रुपये किंवा त्यापेक्षा कमी हप्ता आकारणाऱ्या शासकीय विमा कंपनीची निवड करण्याचे निर्देश क्रीडा आयुक्तांना देण्यात आले आहेत.




अपघाती मृत्यू व अपंगत्वासाठी आर्थिक मदत

वैद्यकीय उपचारासाठी १ लाखांपर्यंतचे कवच



### निकष काय?

■ विमा संरक्षणाचा प्रत्यक्ष लाभ पात्र आणि गरजू गोविंदांपर्यंत पोहोचवण्यासाठी 'महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशन' (अंधेरी, मुंबई) या संस्थेकडे नोंदणीची जबाबदारी देण्यात आली आहे.

■ प्रत्यक्ष दहीहंडीचा सराव आणि प्रशिक्षण घेणाऱ्या, न्यायालयाने निश्चित केलेली वयाची अट पूर्ण करणाऱ्या आणि उत्सवात प्रत्यक्ष सहभागी होणाऱ्या गोविंदांची काटेकोर तपासणी करून असोसिएशनला ही यादी क्रीडा आयुक्तांकडे सादर करावी लागेल.

### नियम व अटी

योजनेचा गैरवापर रोखण्यासाठी शासनाने काही नियम व अटी लागू केल्या आहेत. हे विमा संरक्षण दहीहंडी उत्सवादरम्यान झालेल्या अपघातांसाठीच लागू राहील. इतर कोणत्याही दुर्घटना किंवा अपघात या विम्यासाठी ग्राह्य धरला जाणार नाही.

# संजय गांधी उद्यानाच्या जमिनीवरील वन विभागाचा हक्क कायम

## महसूलमंत्री बावनकुळे यांनी वाचविली हजार एकर जमीन

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

घोडबंदर मार्गावरील भाईंदरपाडा-ओवळे येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या ताब्यातील १ हजार ५३ एकर वनजमिनीवरील वन विभागाचा हक्क कायम ठेवण्यात आला आहे. या जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर 'महाराष्ट्र शासन राखीव वने' तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाची नोंद कायम ठेवण्याचा अंतिम आदेश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला आहे.

महसूलमंत्र्यांच्या या निर्णयामुळे संबंधित वनजमीन खासगी हस्तांतरणापासून सुरक्षित राहणार असून, जमिनीवरील अनिर्बंध विकास आणि मोठ्या बांधकामांना प्रतिबंध राहणार आहे. या निर्णयाबद्दल वनमंत्री गणेश नाईक यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे अभिनंदन केले आहे. वनाची जमीन वनालाच राहिली पाहिजे ही राज्य सरकारची भूमिका यामुळे पुन्हा अधोरेखित झाली आहे, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. महसूल न्यायालयात पार पडलेल्या सुनावणीतील आदेशानुसार, घोडबंदर मार्गावरील भाईंदरपाडा (ओवळे) येथील एकूण १ हजार ५३ एकर जमीन १९७५ पासून वन विभागाच्या ताब्यात असून सातबारा उताऱ्यावर 'महाराष्ट्र शासन राखीव वने' अशी नोंद होती.




"संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाची जमीन खासगी लोकांच्या घशात घातली जात असल्याच्या बातम्या वस्तुस्थितीला धरून नव्हत्या. सरकारचा कधीही वनजमीन खासगी व्यक्तींना देण्याचा उद्देश नव्हता. अंतिम अर्धन्यायीक आदेशाद्वारे जमिनीच्या हस्तांतरणावर आणि वापरावर शासनाचे नियंत्रण कायम राहील, तसेच वन विभागाचा हक्क कायम ठेवत मोठ्या प्रमाणावरील बांधकामांना प्रतिबंध करण्यात आला आहे."

– **चंद्रशेखर बावनकुळे**, महसूलमंत्री, महाराष्ट्र

### महसूलमंत्र्यांचे आदेश

जिल्हाधिकाऱ्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर महसूल विभागाने दाखल पुनर्विलोकन अर्जावर सुनावणी घेतली. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ३१ डिसेंबर २०२५ चे आदेश आणि कोकण आयुक्तांचे ११ जानेवारी २०१९ चे आदेश रद्द ठरवले. उपविभागीय अधिकारी (ठाणे) यांचा १ ऑगस्ट २०१५ चा आणि अपर जिल्हाधिकारी (ठाणे) यांचा २१ मार्च २०१७ चा आदेश कायम ठेवण्यात आला. खासगी खातेदारांची नावे दाखल करणारी फेरफार नोंद क्रमांक ९७५ रद्द करण्यात आली आहे. सातबारा उताऱ्यावर 'महाराष्ट्र शासन राखीव वने' आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाची नोंद कायम ठेवून संबंधित जमीन 'वर्ग-२' म्हणून ठेवली आहे.